# शाहू महाराज : शिक्षणाचा दृष्टीकोन आणि शिक्षण सुधारणा.

**प्रज्ञा अभिजीत बेलेकर,** एम.ए.भाग २, समाजशास्त्र विभाग, न्यू कॉलेज,कोल्हापूर.

Email-pradnyabelekar1292@gmail.com

---

**प्रस्तावना -:**

कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यामुळे कोल्हापूर सारख्या छोट्या संस्थानाचे देशपातळीवर नाव लौकिक प्राप्त झाले आहे. शाहू महाराज हे एक प्रगतिशील विचारवंत होते.ब्रिटिश कालखंडामध्ये "2 एप्रिल 1894 या दिवशी श्री छत्रपती शाहू महाराजांच्या हाती सर्व अधिकारसूत्रे हवाली करण्यात आली." यावेळी ते साधारण 20 वर्षांचे होते. राजर्षी शाहुंची कारकीर्द ही परिवर्तनाचा काळ असे म्हणावे लागेल. त्यावेळी समाज अनेक समाजघातकी प्रथा व परंपरांनी पोखरून गेलेला होता. बहुजन समाज अज्ञान व दारिद्र्याच्या अंधारात बुडाला होता.बहुजन समाजामध्ये अगदी बोटावर मोजता येतील इतकेच मुले मॅट्रिक पास होते. "शिकणे हे आपले कामच नाही" शिकण्याचा हक्क फक्त उच्चवर्गातील श्रीमंत, जमीनदार, सरंजामशाही लोकांचे काम आहे असे मानणाऱ्या बहुजन वर्गामध्ये शिक्षणाची जागृती निर्माण करून दिली.तसेच,"शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही"हे जाणून बहुजन वर्गातील विद्यार्थ्यांसाठी अनेक वसतिगृहे उघडली.तसेच,स्त्रियांनी शिकणे हा गुन्हा आहे, मुलींचे शिक्षण म्हणजे पापचरण करण्यास त्यांना मुक्त वाव देण्यासारखे आहे.अशी समजूत लोकांमध्ये रूढ होती.मुलींचा बालविवाह करणे अशी प्रथा त्या काळी होती.

अशा प्रकारे अज्ञानात बुडालेल्या लोकांना देशाचे हित हे शिक्षणात आहे हे कधीच समजणार नाही, म्हणून श्री छत्रपती शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.समाजाला विकासाच्या दिशेकडे नेण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानात उत्कृष्ट धोरणाने राबविलेले शैक्षणिक कार्य कोणत्याही विकसित देशाला लाजवेल हे आपल्या त्यांनी अंमलात आणलेल्या वेगवेगळ्या कायद्यांवरून लक्षात येते. सदरच्या शोध निबंधाच्या माध्यमातून शाहू महाराजांचा शिक्षणविषयीचा दृष्टीकोण आणि त्यांच्या शैक्षणिक सुधारणा यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचा हेतु :-**

1) शाहू महाराजांच्या शैक्षणिक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
2) शाहू महाराजांच्या शैक्षणिक सुधारणांचा अभ्यास करणे.

**संशोधन सामग्री :-**

सदरचे शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला असून यामध्ये प्रकाशित,अप्रकाशित साहित्य संदर्भग्रंथ नियतकालिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, संकेतस्थळे इत्यादी स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती-**

सदरच्या शोध निबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहे.

**छत्रपति शाहू महाराजांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन –**

शाहू पूर्व काळामध्ये बहुजन समाज अज्ञानाच्या अंधारात बुडालेला होता. फक्त ब्राम्हनांनीच शिक्षण घ्यावे अशी समजूत होती. शिक्षणाचे संस्कार आणि लाभ सामान्य जनतेला होऊ नये अशी शिक्षणक्षेत्राची रचना होती. अशातच ज्यावेळी सन 1894 साली छत्रपती शाहू महाराजांनी अवघे वयाच्या 20 व्या वर्षी राज्यसूत्रे हाती घेतली त्यावेळी करवीर राज्याची शैक्षणिक स्थिति अत्यंत शोचनीय होती. अशा परिस्थितीत "केवळ राज्यातीलच नव्हे तर, सबंध हिंदुस्थानात शिक्षण अवस्थेबद्दल शाहूंनी वस्तुस्थिती दर्शक व सार्थ उद्गार काढले ते म्हणाले "शिक्षणाचे संदर्भात आमचा गतकाल म्हणजे इतिहासातले एक अखंड अंधारी रात्र आहे.केवळ एकच जात विद्येचा उपभोग घेत होती. मनू आणि त्याची मागून आलेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या धोरणाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले आणि आमच्या जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ आणि वेद सुद्धा वाचण्याची त्यांना मनाई होती."

शाहू महाराज सत्य परिस्थिती ओळखून बहुजन वर्गाला **"शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही"**अशी निष्ठा ठेऊन शिक्षणप्रसार करण्यासाठी वेगवेगळ्या योजना काढायच्या योजल्या विद्यार्थ्यांनी विविध विद्याशाखेचे अध्ययन करावे,परगावी परदेशी जाऊन उच्च शिक्षण घ्यावे अशी शाहुंची आस होती. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे एक द्रष्टे समाजसुधारक म्हणजे 'महात्मा फुले' यांनी 'स्त्री शिकली तर घर सुधारते' असे थोर विचार समाजात मांडले आणि त्यावर कार्य सुद्धा केले होते. असे थोर विचारांचा वारसा राजर्षी शाहू महारांजांनी पुढे चालवला आणि स्त्री शिक्षणासाठी आग्रह धरला.या कार्य करीता त्यांनी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या.

**वसतिगृहे चालू करण्यामागे छत्रपती शाहुंची राष्ट्रीय दृष्टी-**

शाहू महाराजांची वसतिगृहे काढण्यामागे राष्ट्रीय दृष्टी होती. त्यांना या कार्यामध्ये लगेचच यश आले असे नाही तर अनेक निराश करणाऱ्या प्रसंगातून,अडचनीतून त्यांनी मार्ग काढला आहे. त्यासाठी त्यांनी अनेक समाजसुधारकांचे विचार घेतले. त्यांनी काही जातवार बोर्डिंग काढले म्हणून त्यांच्यावर टीकाही झाल्या. पण यामागील दृष्टीकोन स्पष्ट करताना कोल्हापूर येथील आर्य क्षत्रीय परिषदेच्या 15 ऑगस्ट 1920 च्या अधिवेशनात ते म्हणाले की, "जातिभेद हा हिंदुस्थानला लागलेला मोठा रोग आहे.पण जातीचा अभिमान मर्यादेत असावा. ज्या समाजात आपण वाढलो त्या समाजाची उन्नती करण्याची काळजी वाहने हे योग्यच आहे. पण, त्या समाजाबाहेरही एक मोठा समाज आहे त्यांची सेवाही आपण केली पाहिजे आपला जातीभिमान हा राष्ट्रकार्याला पोषक असावा. तो राष्ट्रसेवा नजरेआड करणारा नसावा."यातून जाती परिषदा भरविणे,जातवार बोर्डिंग काढणे व त्यातून चारित्र्यसंपन्न व सुसंस्कृत नागरिक घडवून वैचारिक जडणघडणी मधून जातीव्यवस्था हळूहळू कमी करणे हे धोरण समजते. या धोरणासाठी विद्यार्थी वर्ग अधिक उपयोगी पडतील हे लक्षात घेऊन त्यांनी कोल्हापुरात सुमारे 23 बोर्डिंग स्थापन केलीत.

**छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षण सुधारणा –**

**स्त्री शिक्षणविषयक कार्य :-**

मुलींना शिक्षण देण्याविषयीचा दृष्टीकोन पुरोगामी पद्धतीचा होता. "संस्थानात मुलामुलींचा शाळा होत्याच त्याशिवाय खास मुलांच्यासाठीही स्वतंत्र अशा शाळा स्थापन केल्या गेल्या होत्या. विशेषत: भुदरगड सारख्या सह्याद्रीलगतच्या मागासलेल्या भागात मुलींच्या शाळा स्थापन झाल्या होत्या". शाहू महाराजांना तळापर्यंत स्त्री शिक्षणाची जागृती व्हावी असे वाटत होते. त्यांनी 354 नंबरची हुजुराज्ञा 6 ऑक्टोबर 1919 रोजी काढली ती अशी "तमाम लोकांस जाहीर करण्यात येते की ज्यांच्यात पडदा पाळण्याची रीत नाही आणि ज्यांच्यातील मुलींना व स्त्रीयांना शिक्षण घेण्याची ईच्छा आहे,अशा मागासलेल्या वर्गातील लोकांनी अप्पासाहेब तथा मामासाहेब सुर्वे यांच्याकडे तसे अर्ज द्यावेत म्हणजे त्या त्या विद्यार्थीनींची राहण्याची,जेवण्याची व शालेय फी आणि पुस्तकांची सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल"राज्यातील हुशार मुलींसाठी शिष्यवृत्त्या दिल्या. मुलींसाठी स्वतंत्र वर्ग राजाराम कॉलेज मध्ये मोफत स्वरुपात चालू केले."सन 1893-94 मध्ये स्त्री साक्षर तेचे प्रमाण 0.10% इतके होते.परंतु छत्रपती शाहू महाराजांच्या वेगवेगळया उपक्रमांनी तेच प्रमाण सन 1921-22 मध्ये 0.35% इतके झाले"

**प्राथमिक शिक्षण / मोफत सक्तीचे शिक्षण –**

छत्रपती शाहू महाराज सन 1912-13 पासूनच आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे, याबाबत गांभीर्याने विचार करीत होते. शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी त्यांनी वतनी शिक्षण नेमण्याचा प्रयोगही केला मात्र त्यांनी घोषित केले की, "येत्या गणेश चतुर्थीपासून (30 सप्टेंबर) करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात येते आहे" यानंतर 21 सप्टेंबर 1917 रोजी कोल्हापूर संस्थानात 'सक्तीच्या शिक्षणाच्या कायदा' खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला. त्याच्या उद्देशात 'करवीर इलाख्यात आमच्या सर्व प्रजाजणांना लिहिता-वाचता येऊन आपली स्थिती ओळखून समर्थ व्हावे म्हणून कायदा केल्याचे म्हटले होते. या कायदयान्वये शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आईबापांवर सक्ती केली होती. आणि ही जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही तर महिना 1 रुपया दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली. आणि तोही नाही भरल्यास संपत्ती जप्त करण्याचे आदेश दिले कारण शिक्षणविणा कोणीही व्यक्ति वंचित राहू नये ही कळकळ त्यामागे होती.

**माध्यमिक शिक्षण विषयक कार्य -**

"करवीर दरबारची पहिली इग्रजी पूर्ण माध्यमिक शाळा 1867 मध्ये अस्तित्वात आली. तिचे नाव 'कोल्हापूर हायस्कूल'.परदेशी दिवंगत झालेल्या राजाराम महाराजांच्या स्मृतीप्रीत्यर्थ या हायस्कूलचे नाव 1871 साली 'राजाराम हायस्कूल' असे ठेवण्यात आले."परंतु पैशा अभावी येथील विद्यार्थी संख्या कमी येत आहे हे ओळखून छत्रपती शाहू महाराज मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण मोफत केले होते.

**उच्च व तंत्र शिक्षण विषयक कार्य-**

1880 साली राजाराम कॉलेज ची स्थापना झाली होती. या ठिकाणी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन वर्गाच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळवून दिली. तसेच 1912 साली जयसिंगराव घाटगे या इंस्टीट्यूटची स्थापना करून अनेक व्यावसायिक शाळा सुरू केल्या होत्या.

**विविध शाळांची स्थापना –**

"छत्रपती शाहू महाराज यांनी अनेक शाळा सुरू केल्या त्यातील काही पुढीलप्रमाणे,
प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, पूरोहित शाळा ,युवराज/सरदार शाळा, पाटील शाळा, उद्योग शाळा, संस्कृत शाळा, सत्यशोधक शाळा, सैनिक शाळा, बालवीर शाळा, डोंबारी मुलांची शाळा, कला शाळा"

वरील शाळा सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी शाळांची स्थापना केली तसेच संस्कृत शाळा चालू करण्यामागे बहुजन वर्गातील मुलांनी संस्कृत विषयाचे शिक्षण घ्यावे हा त्यांचा ध्यास होता.

**वसतिगृहांची स्थापना –**

लंडनच्या भेटीत शाहू महाराज अभिमानाने म्हणाले होते; यूवर लंडन इज दि मदर ऑफ पार्लमेंट ऑफ हाऊसेस,माय कोल्हापूर इज दि मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस.""सर्व जाती साथी एकच बोर्डिंग काढण्याचा सन 1896 साली केलेला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर शाहू महाराजांनी प्रत्येक जातीचे बोर्डिंग काढण्यास 1901 सालापासून सुरुवात केली."त्या पैकी काही नामांकित बोर्डिंग पुढील प्रमाणे –

व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस (1901),दिगंबर जैन बोर्डिंग (1901),वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह (1906), मुस्लिम बोर्डिंग (1906),मिस क्लार्क हॉस्टेल (1908),दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (1908), श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस (1920)

अशा प्रकारे त्या वेळी "महाराजांच्या प्रोत्साहाने करवीर नगरीत एकूण 23 बोर्डिंग वा विद्यार्थी वसतिगृहे उभारली गेली."या वसतिगृहांना महाराजांनी जागा दिल्या,इमारती दिल्या,जमिनी दिल्या,रोख रक्कमा दिल्या,काही रकमा त्यांच्या नावे सरकारी खजिन्यात ठेऊन आठ टक्के व्याजचे कायमचे उत्पन्न करून दिले धान्य दिले, भांडी दिली, वार्षिक अंनुदानही दिले."या कार्यातून छत्रपती शाहू महाराजांची बहुजन वर्गांनी शिकावे अशी भावना दिसून येते.

**विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या –**

महाराजांनी त्या काळामध्ये शिष्यवृत्ती विषयक शिक्षणाची गरज ओळखली व दलित बहुजन अशा सर्वसाधारण लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा त्याच बरोबर तलाठी,शेतकरी,तंत्र शिक्षण संस्था यामध्ये मागास जातीच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती योजना चालू केली."

**सारांश-**

ब्रिटिश राजवटीमध्ये 'पंख कापलेल्या गरुडासारखी' अवस्था छत्रपती शाहू महाराज यांची झाली होती. चक्रव्यूहाच्या अशा काळात देखील त्यांनी 'मोडेन पण वाकणार नाही', या जिद्दीने आणि अत्यंत संयमाने लोक कल्याणाचा वसा हाती घेतला. दरिद्री, अज्ञान, अंधश्रद्धा याने जनता ग्रासली होती. आणि यावर फक्त शिक्षणच उपाय आहे,आणि म्हणूनच 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही',हे त्यांनी जाणले होते. आणि म्हणूनच,त्यांनी शिक्षणाविषयी बहुजन वर्गांमध्ये जागृती करण्यास प्रारंभ केला.यासाठी त्यांनी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण चालू केले. मुलींसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. सन 1893-94 मध्ये स्त्री साक्षर तेचे प्रमाण 0.10% इतके होते.परंतु छत्रपती शाहू महाराजांच्या वेगवेगळ्या उपक्रमांनी तेच प्रमाण सन 1921-22 मध्ये 0.35% इतके झाले. वेगवेगळी शाळा व वसतिगृहे स्थापन करून बहुजन वर्गातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. शाहू महाराजांची वसतिगृहे काढण्यामागे राष्ट्रीय दृष्टी लक्षात येते. महाराजांनी त्या काळामध्ये शिष्यवृत्ती विषयक शिक्षणाची गरज ओळखली व दलित बहुजन अशा सर्वसाधारण लोकांमधील वंचित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा त्याच बरोबर तलाठी,शेतकरी,तंत्र शिक्षण संस्था यामध्ये मागास जातीच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती योजना चालू केली. शाहू शताब्दी च्या काळात देखील आजही सर्व बहुजन वर्ग वरील सर्व गोष्टींचा लाभ घेतो आहे.

**संदर्भग्रंथ–**


1. लट्ठे आ.बा.,(१९२५)श्री शाहू छत्रपती यांचे चरित्र, पृ.क्रं. ७३
2. सूर्यवंशीकृ.गो. (१९८४), राजर्षी शाहू राजा व माणूस, पृ. क्रं. १३०
3. कित्ता, पृ. क्रं.१३१
4. कित्ता, पृ. क्रं.१७०
5. कित्ता, पृ. क्रं.१३१
6. आर्यवंशीय ज्ञानवर्धक समाज ५ वी परिषद दि: १५ ऑगस्ट १९२०
7. पवार जयसिंगराव (संपा)२००७,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,कोल्हापूर पृ.क्रं. १२२
8. सूर्यवंशीकृ.गो. (१९८४)राजर्षी शाहू राजा व माणूस, पृ. क्रं.१८८
9. कित्ता, पृ. क्रं.१९०
10. कित्ता, पृ. क्रं.१६७
11. कित्ता, पृ. क्रं.१६१
12. कित्ता, पृ. क्रं.१६१
13. समाजशास्त्रज्ञ राजर्षी शाहू -स.शा.ॲड.के.टी.मंगल पृ.क्रं. १३
14. कित्ता पृ.क्रं.१५